भाजपामध्ये सर्वात प्रभावी खासदार मानले जातात'' असे लिहिले, तर त्या नंतर 5 जानेवारी 1992 च्या टाइम्स ऑफ इंडियामध्ये त्यावेळचे विशेष प्रतिनिधी श्री. राजदीप सरदेसाई यांनी (आताच्या आयबीएन चे सर्वेसर्वा) महाराष्ट्रातील 48 खासदारांचे वेगवेगळ्या निकषावर मूल्यमापन करुन मला सर्वोत्कृष्ट खासदार ठरविले. करीत असलेल्या कामांची अशी क्वचित मिळणारी पावती मोठ्या मोलाची असते.

लोकसभेमध्ये विरोधी पक्षात राहूनही सर्वांच्या लक्षात राहतील अशी अनेक कामे केली असली तरी मला स्वत:ला समाधान वाटते ते इंग्रजीतील 'बॉम्बे', हिंदीतील 'बम्बई' ऐवजी 'मुंबई' हेच नाव सर्व भाषात वापरण्याच्या निर्णयाचे, अर्धा तास प्रश्नाच्या चर्चेच्या माध्यमातून संसदेमध्ये प्रत्येक अधिवेशनाच्या सुरुवातीला 'जन-गण-मन' हे राष्ट्रगीत तर समारोपाच्या प्रसंगी 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगान गाण्यास प्रारंभ, लोकसभा आणि राज्यसभा खासदारांना छोट्या-छोट्या विकास कामांसाठी एक कोटीच्या खासदार निधीला मान्यता, स्तनपानास प्रोत्साहन आणि शिशुखाद्याच्या जाहिरातीस विरोध करणा-या खाजगी विधेयकास सरकारची मंजूरी, आदी कामांचे.

या काळातच 1993 मध्ये मुंबईत बॉम्बस्फोट व दंगली झाल्या. अख्खी मुंबई पेटली होती. मी त्यावेळीही भाजपा मुंबईचा अध्यक्ष होतो. त्या परिस्थितीत ठिकठिकाणी जाऊन परिस्थिती शांत करण्याचे प्रयत्न केले. माझ्या मतदार संघातही ठिकठिकाणी मिश्र वस्त्या होत्या. उत्तर मुंबईत फक्त एकाच ठिकाणी दंगल झाली. अन्यत्र त्याचे पडसाद उमटू न देण्याचे आमचे प्रयत्न यशस्वी झाले.

1993 मध्ये माझ्या आग्रहामुळेच नव्याने सुरु झालेल्या जगातील पहिल्या महिला लोकलगाडीची दुर्घटना होऊन 26 महिला मृत्यू पावल्या. तो एक दुर्दैवी अपघात होता. पावसाळ्यात ओव्हरहेड वायरमधून बाहेर आलेल्या ठिणग्यांना आग समजून अनेक महिलांनी बाहेर उडी घेतली. सायंकाळी उशिराची वेळ, त्यात पाऊस. दुस-या बाजून येणारी गाडी त्यांना दिसलीच नाही. आजही ते आठवले की मन सुन्न होते. मुलाबाळांसाठी, संसारासाठी नोकरी करणा-या त्या सर्व मध्यमवर्गीय स्त्रिया होत्या. त्यातूनच मग अन्य वाहन अपघातांप्रमाणेच रेल्वे अपघातांतही प्रवाशांना विमा असला पाहिजे हा विचार मनात आला. तेही काम करु शकलो. त्याच कायद्यामुळे आता ठिकठिकाणी होणा-या दुर्दैवी अपघातांतील जखमींना, मृतांच्या नातेवाईकांना काही नुकसानभरपाई तरी मिळते.

### कर्करोगाशी टक्कर

याच काळात शेअर घोटाळा झाला. त्याबाबत संसदेने नेमलेल्या संयुक्त समितीवर मी होतो. देशभर दौरे करुन आम्ही त्या घोटाळ्याची सर्वांगीण चौकशी केली. त्या काळात पायाला भिंगरी लागल्यागत फिरत होतो. दररोज बाहेरचेच जेवण. मला तर घरचे साधे जेवण प्रिय. महिन्या-दीड महिन्यांनी घरी गेल्यावर थोडा बारीक झाल्याचे पत्नीला वाटले. पण ते त्या भ्रमंतीमुळे, जेवणाच्या हालांमुळे असेच आम्ही समजलो. परंतु लोकसभेच्या सभागृहात बसलो असताना अचानक माझे सहकारी खासदार श्री. अण्णा जोशी व डॉ. गुणवंत सरोदे या दोघांनाही माझे डोळे, त्वचा पिवळट वाटली. डॉ. सरोदे हट्टानेच लोकसभेतीलच दवाखान्यात मला घेऊन गेले. आयुष्यातील सर्वांत कठीण कॅन्सरयात्रेची अशी सुरुवात झाली. काय विचित्र योग बघा. थोरली कन्या डॉ. निशिगंधाला तिच्या कर्करोग संशोधनासाठी राष्ट्रपतींनी युवा शास्त्रज्ञांचा इन्सा पुरस्कार दिला. टाटांच्या कर्करोग संस्थेत काम करीत असतानाच पुढील संशोधनासाठी ती दोन वर्षे फ्रान्सला गेली आणि अवघ्या चार महिन्यात मला कर्करोग तपासणीसाठी टाटातच जावे लागले. खासदार असल्याने परदेशी उपचारांना जाणेही शक्य होते. पण इथल्या डॉक्टरांनी आम्हीही उपचार करु शकतो असे विश्वासाने म्हटल्यावर मी मुंबईतच टाटा रुग्णालयात उपचार घ्यायचा निर्णय घेतला. शारीरिक पीडेला पुरुन उरेल असे मनोबळ ठेवायचा माझा निर्धार होता. त्याला घरच्यांनीही साथ दिली. माझे मित्र प्रा. राम कापसे तर कौतुकाने म्हणाले, ''संकटाची समोर चाहूल लागली तरी तुम्ही बाह्या सरसावून मुकाबला करायला स्वत:च पाऊल पुढे टाकता''. सुहृदांच्या प्रेमाच्या सात जन्म पुरतील अशा आठवणी या सहा-सात महिन्यांत जमा झाल्या. कधी रात्री 10.30 वाजताही दिल्लीहून लालकृष्ण आडवाणीजींचा चौकशीला फोन यायचा. अटलजींसारखा मोठा माणूस परदेशी दौ-यावर जात असताना दोन विमानांच्या मधल्या वेळेत कोणालाही न सांगता फक्त कै. पंत मराठे या आमच्या सहका-याला घेऊन मला बघायला येऊन जातो हे आजही अविश्वसनीय वाटते. राजकीय विरोधक असूनही अनेक मंत्री, खासदार आले तर कधी एक सामान्य रिक्षावाला आला नि रडत म्हणाला ''साब आपको एक मच्छर काटेगा तो भी हमको दर्द होता है''. बरा झाल्यावर मा. अटलजींच्या उपस्थितीत कामाचा पुनश्च हरिओम् केला. त्यावेळी लोटलेली गर्दी पाहून हळवे होत अटलजीही जाहीरपणे म्हणून गेले, ''जेव्हा एखाद्या सहका-याला जनतेचं असं प्रेम मिळालेलं बघतो तेव्हा खरं तर थोडा मत्सरही वाटतो....''

### निवडणुकांचे राजकारण

आता मिळालेले आयुष्य बोनस समजून दुप्पट वेगाने कामाला लागलो. लोकसभेच्या अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणा-या लोकलेखा समितीचा मी अध्यक्ष नेमलो गेलो. रेल्वे मंत्र्यांच्या विमानाचा प्रचंड दुरुपयोग, वगैरे अनेक घोटाळे अध्यक्ष म्हणून काम करताना उजेडात आणले. 1996 च्या सार्वत्रिक निवडणुकीचा पहिला टप्पा संपला, मुंबईत मतदान व्हायचे होते, त्या दरम्यानच पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या झाली. स्वाभाविकच निवडणूक निकालांवर त्याचा परिणाम होऊन पुढच्या टप्प्यात बहुतेक सर्वत्र कॉंग्रेसचे उमेदवार निवडून आले. त्याही परिस्थितीत मी मुंबईत सर्वाधिक मते मिळवून सलग तिस-यांदा खासदार झालो.

लोकसभेचा हा काळ अस्थिरतेचा होता. भाजपा सर्वात मोठा पक्ष म्हणून निवडून आल्याने मा. अटलजी पंतप्रधान बनले. परंतु सभागृहात बहुमत न मिळाल्याने आमचे केंद्रातले पहिले सरकार 13 दिवसच